# क्विक फिल्ड फाऊंडेशनच्या बुकलेट्स मधून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचा संदेश

**जामनेर । किसान न्युज**

सायबर गुन्ह्यांपासून विद्यार्थ्यांचे संरक्षण व्हावे आणि त्यांच्यामध्ये सुरक्षित डिजिटल वापराबाबत जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी इंदिराबाई ललवाने ज्युनियर स्कूल, जामनेरपुरा येथे सायबर अवेअरनेस सेशन घेण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सायबर फसवणुकीच्या विविध प्रकारांची माहिती देण्यात आली. सायबर वॉरियर्सनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन स्कॅम, फेक लिंक, बनावट वेबसाइट, ओटीपी फ्रॉड, सोशल मीडिया फसवणूक आणि संशयास्पद कॉल यांसारख्या विविध प्रकारांबाबत मार्गदर्शन केले. सायबर गुन्हेगारांकडून फसवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या पद्धती ओळखण्याचे आणि अशा प्रकारच्या आमिषांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी क्विक फिल्ड फाऊंडेशनकडून उपलब्ध करून देण्यात आलेल्या सायबर अवेअरनेस बुकलेट्सचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. या बुकलेट्समधील माहिती विद्यार्थ्यांनी व्यवस्थित वाचावी, समजून घ्यावी आणि त्यातील सुरक्षा नियम दैनंदिन जीवनात वापरावेत, यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रात जान्हवी सपकाळे, वैष्णवी सैतवाल, साक्षी पाटील, विद्या सोनवने, राहुल चोपडे आणि जय ठाकूर या सायबर वॉरियर्सनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही सत्रात सक्रिय सहभाग घेत विविध प्रश्न विचारले. इंटरनेटचा वापर करताना स्वतःची वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व त्यांना समजावून सांगण्यात आले. प्राचार्य गायकवाड यांच्या सहकार्याने आणि आर. बी. आमले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी या बुकलेट्सचा उपयोग करून स्वतःसोबतच आपल्या पालकांनाही सायबर सुरक्षेबाबत माहिती द्यावी, असा संदेश देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली.

